# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना कमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर-४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२-२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.रातुमविनावि/म.वि.वि.'/5428 पदव्युत्तर प्रवेश दिनांक:- 14/6/२०१९.
5428

## : : परिपत्रक : :

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, विद्यापीठ संचालित व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रवेशासाठी इच्छुक संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, सत्र २०१९-२० या शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठाने सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही केंद्रिय प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने एकूण तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

ऑनलाईन केंद्रिय प्रवेश पध्दतीच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रवेशाच्या दोन फेरी ऑनलाईन पध्दतीने करण्यांत येत आहे. त्यानंतर उर्वरित रिक्त प्रवेशांच्या जागांवर विद्यापीठाने जाहिर केलेल्या गुणवत्ता यादीमधील विद्यार्थ्यांना तीस-या फेरीमध्ये विद्यापीठाच्या गुरुनानक भवन येथे समुपदेशनाद्वारे (Counciling) विद्यापीठाद्वारे वेळोवेळी जाहिर करण्यात येणा-या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश करण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच ज्या अल्पसंख्याक महाविद्यालयांना ज्या अभ्यासक्रमाच्या त्यांच्या कोटयाच्या जागा विद्यापीठामार्फत केंद्रिय प्रवेश पध्दतीने भरावयाच्या आहेत त्या महाविद्यालयानी त्वरित विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास विभागाला त्वरित कळवावे.

विद्यापीठाद्वारे केंद्रिय प्रवेशाकरिता निर्गमित करण्यांत येणारे वेळापत्रक विद्यापीठाचे संकेत स्थळावर तसेच वृत्तपत्रामध्ये वेळोवेळी प्रकाशित करण्यांत येईल याची देखिल नोंद घेण्यात यावी.

विभागात/महाविद्यालयांमध्ये झालेला प्रत्येक प्रवेश हा विद्यापीठाच्या महाविद्यालयाच्या Log-in-ID मध्ये Upload करण्यांत यावा. व झालेल्या सर्व प्रवेशाची यादी तीन प्रतीमध्ये प्रवेशाच्या अंतिम तारखेनंतर त्वरित विद्यापीठास सादर करण्यांत यावी.

मा. प्र-कुलगुरु तथा सक्षम
अधिका-याचे आदेशान्वये

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (अति.कार्य)